आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – रात्री ८.०५ वाजता
८ ऑक्टोबर २०२३ – रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरातल्या निबंधक कार्यालयांचं संगणकीकरण करण्याचा केंद्रीय सहकार मंत्र्यांचा निर्णय
- भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिन सोहळ्यात नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण
- सिक्कीममध्ये तिस्ता नदी खोऱ्यातल्या पूरबळींची संख्या ३३ वर
- चीनमध्ये हाँगझू इथल्या ऑलिम्पिक क्रीडा केंद्रात १९ व्या आशियाई क्रीडा स्पर्धेचा रंगतदार सोहळ्यात समारोप

  **आणि**
- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत चेन्नईत सुरु असलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचं भारतापुढं विजयासाठी २०० धावांचं आव्हान /भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

केंद्र सरकारनं देशातल्या सर्व सहकारी संस्थांना मजबूत करण्यासाठी अनेक पावले उचलली असून त्या अंतर्गत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी देशभरातल्या निबंधक कार्यालयांचं संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबरोबरच १३ राज्यांमधल्या १ हजार ८५१ कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या संगणकीकरणालाही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे २२५ कोटी रुपयांच्या या योजनेसाठी एक मध्यवर्ती प्रकल्प देखरेख विभाग स्थापन केला जाईल. या योजनेमुळे या कार्यालयांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि एकसूत्रीपणा येऊन नागरिकांना सुलभ रीतीनं सेवा मिळू शकतील.

<><><><><>

भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा आज उत्तर प्रदेशात प्रयागराजच्या बमरौली तळावर झाला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी यानिमित्त आयोजित संचलनाची पाहणी केली. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि इतर मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

यावेळी एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण केलं. यावेळी जुना बोधचिन्हांकीत ध्वज सन्मानपूर्वक उतरवून हवाई दलप्रमुखांकडे सुपूर्द केला गेला. आता हा जुना बोधचिन्हांकीत ध्वज हवाईदलाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवला जाणार आहे. यंदाची हवाई दलाची संकल्पना “हवाई ताकद - सीमापार” अशी आहे.

मुंबईत यानिमित्तानं आयोजित केलेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हवाई दल केवळ आकाशातून संरक्षण करत नाही तर देशाच्या कोणत्याही भागाला नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसला तर तात्काळ धावून जातं, असं एअर व्हाईस मार्शल रजत मोहन यांनी सांगितलं. हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमीत्त राष्ट्रपती, प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी भारतीय हवाई दलाचे सर्व जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

हवाई दलाच्या संचलनात पॅरा जम्पर्सनी विशेष थरारक कसरती सादर केल्या. ४०० शालेय विद्यार्थ्यांसह सुमारे अडीच हजार नागरिकांनी या कसरतीचा थरारक आनंद लुटला. यानंतर संगम परिसरात झालेल्या एअर डिस्प्लेमध्ये १०० होऊन अधिक लढाऊ आणि मालवाहू विमानं सहभागी झाली होती. सुखोई - ३०,

राफेल, तेजस, हर्क्युलिस यासारखी विमानं आणि काही हेलिकॉप्टर्स यांनी हवाई दलाच्या सामर्थ्याचं उपस्थितांना दर्शन घडवलं . या समारंभात मिग - २१ विमानांना औपचारिक निरोप देण्यात आला तर हवाई दलात नुकत्याच सामील झालेल्या सी - २९५ मालवाहू विमानांनी प्रथमच सहभाग नोंदवला.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज वाराणसीतल्या बनारस हिंदू विद्यापीठ इथं आयआयटीने आयोजित केलेल्या विद्यार्थी समुपदेशन कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यासाठी तसंच देशाच्या भविष्यासाठी काम केलं पाहिजे. विद्यार्थ्यांनी त्यांचे काम आणि त्यांचे जीवन यामध्ये संतुलन राखले पाहिजे जेणेकरून ते कमीतकमी तणावाखाली राहू शकतील असं यावेळी त्या म्हणाल्या. केंद्र सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात मानसिक आरोग्यासाठी १२०० कोटी रुपयांची तरतूद केली असून, त्याचे फायदे मिळत असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. आयुष्मान भारत अंतर्गत मानसिक आजारी रूग्णांवर उपचाराचीही व्यवस्था करण्यात आली असल्यांचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

कर्नाटकात अत्तिबेळे इथल्या अग्नितांडवातल्या प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना तामिळनाडू सरकारनं तीन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. गंभीर जखमींना प्रत्येकी एक लाख तर किरकोळ जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्याची घोषणा तामिळनाडूचे आरोग्य मंत्री एम. सुब्रमण्यम यांनी केली. या दुर्घटनेत मृत्यू पावलेले सर्व जण तामिळनाडूचे रहिवासी होते.

काल एका फटाक्याच्या दुकानाला लागलेल्या आगीत या १४ जणांचा होरपळून मृत्यू झाला. आग लागली तेव्हा या दुकानात ३५ जण काम करत होते. दुपारी साडे तीनच्या सुमारास लागलेली ही आग अग्निशामक दलाच्या ९ बंबांनी रात्री साडे आठ वाजेपर्यंत आटोक्यात आणली.

<><><><><>

सिक्कीममध्ये तिस्ता नदीच्या खोऱ्यात आलेल्या पुरातल्या मृत्यूंची संख्या ३३ वर पोहोचली आहे. यात भारतीय सैन्याच्या ९ जवानांचाही समावेश आहे. अद्याप १०५ जण बेपत्ता असल्याची माहिती सिक्कीमच्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली आहे. आतापर्यंत पुराच्या तडाख्यात सापडलेल्या २ हजार ५६३ जणांची यशस्वी सुटका केली असून, सध्या २८ मदत छावण्यांमध्ये सुमारे ६ हजार ४८७ लोकांनी आश्रय घेतला असल्याचंही प्राधिकरणानं कळवलं आहे. या पुरामुळे १३ पूल वाहून गेले तर १ हजार ३२० घरांचं मोठं नुकसान झालं.

चांगथांग इथं पेंगाँगला जोडणारा बांबुचा तात्पुरता पुल उभारला असून, त्यामुळे या क्षेत्रात अडकलेले पर्यटक आणि स्थानिकांची सुटका करायला मतद मिळणार आहे. यासोबतच लष्करानंही नव्या पुलाच्या उभारणीचं काम हाती घेतलं आहे.

दरम्यान केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा यांनी मंगन जिल्ह्यात नागा इथल्या पूरग्रस्त भागाची पाहणी केली. त्यांनी पूरग्रस्तांना आवश्यक त्या सर्व मदतीचं आश्वासन दिलं, तसंच संपर्क तुटलेल्या भागात अडकलेल्या लोकांच्या मदत आणि बचावाला प्राधान्य देण्याची सूचना केली. सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांनीही फिडांग पूल आणि डिकचू जवळच्या पूरानं बाधित भागाला भेट दिली, आणि पूरग्रस्तांना शक्य ती सर्व मदत आणि सहकार्याचं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

चीनमध्ये हाँगझू इथल्या ऑलिम्पिक क्रीडा केंद्रात १९व्या आशियाई क्रीडास्पर्धांचा रंगतदार सोहळ्यात समारोप झाला. या समारोप सोहळ्यात हॉकीपटू पी आर श्रीजेश यानं भारताचा ध्वज धारण करत, पथकाचं नेतृत्व केलं.

या स्पर्धेत भारतानं २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कांस्य पदकांसह १०७ पदकांची विक्रमी कमाई करत, पदक तालिकेत चौथं स्थान मिळवलं. पदकतालिकेत चीननं २०१ सुवर्ण, १११ रौप्य आणि ७१ कांस्य पदकांसह ३८३ पदकांची कमाई करत पहीलं स्थान पटकावलं, तर जपाननं ५२ सुवर्णपदाकांसह एकूण १८८ पदकं जिंकत दुसरं स्थान मिळवलं. कोरिया प्रजासत्ताकनं ४२ सुवर्णपदकांसह एकूण १९० पदकांची कमाई करत तिसरं स्थान पटकावलं.

ऑलिम्पिक्स, राष्ट्रकुल आणि आशियाई खेळ या तीन प्रमुख स्पर्धांपैकी कोणत्याही स्पर्धेत भारतानं केवळ दुसऱ्यांदाच १०० हून अधिक पदकं जिंकली आहेत. या स्पर्धेतल्या कामगिरीच्या आधारावर मुष्टीयुद्धात निखत झरीन, प्रिती पवार, परवीन हुडा, लवलिना बारगोहेन, ॲथलेटीक्समध्ये किशोर जिना आणि भारताचा पुरुष हॉकी संघ पॅरीस ऑलिम्पिकसाठी थेट पात्र ठरले आहेत.

आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकं जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

यंदाच्या स्पर्धेत ४५ देशांमधले १२ हजार ४०७ खेळाडूंनी ४० क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झाले होते.

**<><><><><>**

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज चेन्नईत सुरु असलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतापुढं विजयासाठी २०० धावांचं आव्हान ठेवलं आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र भारताच्या गोलंदाजांनी उत्तम कामगिरी करत धावगती रोखल्यानं त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. स्टीव्हन स्मिथनं सर्वाधिक ४६, तर डेव्हीड वॉर्नरनं ४१ धावा केल्या. शेवटचे तीन चेंडू बाकी असताना १९९ धावांवर ऑस्ट्रेलियाचा डाव संपला.

भारतातर्फे रविंद्र जडेजानं ३, तर जसप्रित बुमराह आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

भारताचीही सुरुवात खराब झाली. कर्णधार रोहित शर्मा आणि इशान किशन या दोन्ही सलामीवीरांसह श्रेयस अय्यर खातंही न उघडता तंबूत परतले.

<><><><><>

लडाखमध्ये लडाख स्वायत्त हिल विकास परिषद, कारगिलच्या पाचव्या निवडणुकीची मतमोजणी आज सकाळी सुरू झाली. मतमोजणीच्या सहाव्या टप्प्याअखेर काँग्रेसनं ७, नॅशनल कॉन्फरन्सनं ५, भाजपानं २ आणि अपक्ष उमेदवारानं १ जागा जिंकली होती.

<><><><><>

एअर इंडियानं इस्राएलच्या तेल अवीव इथे जाणाऱ्या आणि येणाऱ्या आपल्या विमानांची उड्डाणं येत्या १४ तारखेपर्यंत रद्द केली आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची तसंच विमान कर्मचाऱ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचं विमान कंपनीनं म्हटलं आहे. मात्र या कालावधीत विमानाचं आरक्षण केलेल्या प्रवाशांना सर्वतोपरी सहाय्य्य केलं जाईल, असंही कंपनीनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

सीबीआयनं आज पश्चिम बंगालमध्ये नागरी संस्थांद्वारे केलेल्या भरतीमधील कथित अनियमिततेच्या चौकशीच्या संदर्भात ज्येष्ठ मंत्री फिरहाद हकीम आणि टीएमसी आमदार मदन मित्रा यांच्या निवासस्थानांसह १२ ठिकाणी झडती घेतली. सीबीआय अधिकाऱ्यांचे एक पथक आज सकाळी केंद्रीय दलाच्या मोठ्या तुकडीसह या दोघांच्या घरी पोहचलं होत. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी आज कोलकाता, कांचरापारा, बॅरकपूर, हलीसहर, दमदम, उत्तर दमडम, कृष्णानगर, टाकी, कमरहाटी, चेतला आणि भवानीपूर येथील सार्वजनिक सेवक इत्यादी ठिकाणांचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

सिक्कीममधल्या पुरात वीरगती प्राप्त झालेले बीड जिल्ह्यातले जवान पांडुरंग तावरे यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी पाटोदा तालुक्यातल्या काकडहिरा या त्यांच्या राहत्या गावी लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती तहसीलदार बालाजी चितळे यांनी दिली. सिक्कीममध्ये गेल्या चार तारखेला तिस्ता नदीला पूर येऊन लष्कराची छावणी वाहून गेली. तीन दिवसांनंतर शहीद जवान पांडुरंग तावरे यांचं पार्थिव हाती लागलं. विशेष विमानानं ते आज पुण्यात आणलं.

**//<><><><><>//**